Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# ग्रंथालय : ज्ञानाचे एक केंद्र

**प्रा. रंजना बी व्यवहारे**
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स 310—ब, न्यु नंदनवन, नागपूर
Email - taywadev@gmail.com

---

***सार :***

*पुर्वीच्याकाळी ग्रंथालय म्हणजे एक छोटीषि खोली व त्यात मोजकेच पुस्तके आणि बाहेर बसलेले त्या पुस्तकाचा रखवालदार असे चित्र असायचे. पण आता ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा खजिना आहे. आधुनिक काळात ग्रंथालयाला विषेश महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. कोणत्याही प्रकारची माहिति क्षणात उपलब्ध ग्रंथालयात होत असते .म्हणूनच ग्रंथालयाला ज्ञानाचे केंद्र असे म्हटले जाते..*

*आधुनिक काळात ग्रंथालय हे ज्ञानाचा खजिना असलेले महत्वाचे केंद्र मानल्या जात आहे. ग्रंथालयाचे वेगवेळया प्रकारे स्तर आहेत. शाळा, महाविद्यालय, आणि विद्यापीठ. तसेच तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व सार्वजनिक ठिकाणी, संशोधनपर ग्रंथालय सुध्दा दिसून येतात.*

---

## शैक्षणिक ग्रंथालय :

शैक्षणिक ग्रंथालयाचा विचार करतांना प्रमुख तीन प्रकारच्या ग्रंथालयाचा यात समावेश होतो.

1. शालेय ग्रंथालय
2. महाविद्यालयीन ग्रंथालय
3. विद्यापीठ ग्रंथालय

## शालेय ग्रंथालय :

शालेय ग्रंथालयामध्ये 5 ते 10 या वर्गांचा समावेश होतो. शालेय ग्रंथालय ही विद्यार्थांच्या शैक्षणिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. शालेय ग्रंथालय विद्यार्थांच्या विकासात महत्वाची भमिका बजावत असल्याचे दिसून येते. दिसून येते. शालेय ग्रंथालय हे शाळेचे ह्मदय म्हटले जाते. शालेय ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या बौध्दीक विकासात भर पाडण्याचे काम तर करतातच त्याच बरोबर त्यांना चांगले संस्कार देण्याचाही प्रयत्न केल्या जातो. त्यांच्यात चांगल्या सवयी रूजविण्याचाही प्रयत्न केल्या जातो. शालेय जीवनापासून विद्यार्थांना वाचनाची सवय लागली तर ती सवय त्यांना जीवनात यशस्वी होण्याकरिता फार उपयुक्त ठरू शकते.

शालेय ग्रंथालयात पाठयक्रमाच्या पुस्तका बरोबरच अनेक प्रकारच्या वाचनीय पुस्तकांचे भंडार असते. जसे साहित्यिक त्यात कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, तसेच

वेगवेगळया विषयावर संदर्भ ग्रंथ, मॅगझीन्स्, न्युज पेपर इ. प्रकारचे वाचन साहित्य त्यांना एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याचे एकमेव स्थान म्हणजे ग्रंथालय होय. शालेय जीवनात एकदा का साहित्याची आवड निर्माण झाली तर दिवसेंदिवस वाढतच जाते आणि विद्यार्थंच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडत जाते. वाचनाने विद्यार्थी प्रगल्ब व स्वावलंबी होत जातो.

**महाविद्यालय ग्रंथालय :**

महाविलयीन ग्रंथालयात क्रमिक अभ्यासक्रमाची पुस्तके, संदर्भग्रंथ, विश्वकोश, शब्दकोश चरित्र–आत्मचरित्र, कथा, कादंब–या, नकाशासंग्रह, गॅझेटियर्स तसेच अध्यापनास पूरक अशा द्क–श्राव्य साधने, ऑडिओ, व्हिडिओ, प्रोजेक्टर अशा प्रकारच्या सर्व साधनांचा ग्रंथालयात समावेश होतो.

महाविद्यालयीन ग्रंथालय म्हटले की त्यांचे विस्तारीत रूप आपल्या लक्षात येते. महाविद्यालयात वेगवेगळया शाखा त्यांची माध्यम असतात, त्या शाखेनुसार आणि माध्यमानुसार पुस्तकांची खरेदी केल्या जातात. महाविद्यालयीन ग्रंथालयाची काम वेगवेगळया प्रकारची असल्याचे दिसून येते. जसे ग्रंथालयात आलेल्या पुस्तकांचे व्यवस्थित व्यवस्थापन करणे, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांना लागणारे पुस्तके बरोबर पुरविणे, त्यांना अवांतर वाचनीय पुस्तकांची माहिती देऊन ते विद्यार्थापर्यंत पोहचविणे, संदर्भ ग्रंथाची माहिती देणे, विद्यार्थांमध्ये वाचन कौशल्य विकसीत करणे, त्यांच्या विषयांची अंद्यावत माहिती देणे, संदर्भ ग्रंथ पुरविणे, विद्यार्थांना वाचन कक्ष उपलब्ध करून देणे अशा अनेक प्रकारची कामे महाविद्यालयीन ग्रंथालयाला करावी लागतात.

**विद्यापीठ ग्रंथालय :**

विद्यापीठ ग्रंथालयात प्रत्येक विषयाच्या पदव्युत्तर वर्गाचे क्रमिक पुस्तके तर असतातच त्याचबरोबर सगळया विषयाची संदर्भ ग्रंथ, त्या–त्या विषयाशी संबंधीत अनेक प्रकारची संदर्भ ग्रंथ मिळण्यासय मदत होते. त्याचप्रमाणे प्रत्येक विषयात निधणारे जर्नल्स ही उपलब्ध असतात. तसेच वेगवेगळया विषयावर निघणारे नियतकालिके, हस्तलिखिते, दृक–श्राव्य साधने, व्हिडिओ कॅसेट, सी.डी. रॉम इ. आधुनिक प्रकारच्या शैक्षणिक साहित्याचाही समावेश असतो. विद्यापीठ ग्रंथालय प्रचलित घडामोडीचे ज्ञानकेंद्र असून अनेक प्रकारची वृत्तपत्रे ग्रंथालयात येतात. त्या वृत्तपत्रातील महत्वाच्या माहितीचे कात्रण सुद्धा उपलब्ध होवू शकतात. तसेच नवीन येणा–या ग्रंथाची माहिती, नविन नियतकालीकांची माहिती विद्यापीठ ग्रंथालयात मिळण्यास मदत होते.

**संशोधन ग्रंथालय :**

प्रत्येक देशात संशोधनाला एक महत्वपूर्ण कार्य मानल्या गेले. देशाच्या विकासात संशोधनाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दरवर्षी संशोधन कार्याकरिता एक सुनिश्चित

निधी खर्च करीत असतात. संशोधन संस्थाची जी ग्रंथालये असतात, यात एक विशिष्ट प्रकारचा संग्रह केल्या जातो. ज्यामुळे संशोधक त्यांना पाहिजे असलेली माहिती मिळवू शकेल. संशोधन ग्रंथालयांना केवळ विशेश स्वरूपाची ग्रंथसंपदाच न ठेवता प्रलेख, माहितीचे स्त्रोत, संदर्भ सहाय्य ग्रंथ याचे संकलन केल्या जाते. यामुळे संशोधकांना काम करणे सोपे जाते.

**सार्वजनिक ग्रंथालये :**

सार्वजनिक ग्रंथालयात येणारे वाचक सर्व स्तरातील म्हणजे लहाण्यापासून मोठयापर्यत स्त्री–परुष गरिब–श्रीमंत असतात.त्यामुळे येथील वाचकांच्या मागण्या वेगवेगळया प्रकारच्या असतात. लहान मुलांना त्याच्यानुसार म्हणजे छोटी छोटी गोष्टींची पुस्तके, काही प्रयोगपर पुस्तके छोटी मासिके, चित्रे असलेली, आकृत्या असलेली आकर्षक पुस्तके त्यांना जास्त प्रमाणात आवडतात. या वयातल्या वाचकांसाठी काही शब्दकोश, ज्ञानकोश असतात, काही जादुचे प्रयोग करणारे, विज्ञानपर पुस्तके त्यांना उपयुक्त ठरणारे असतात. तर स्त्रीयांची, आबाल वृद्धांची आवड वेगळी असते. त्यानुसार त्यांना त्यांच्या आवडीची कथा, कांदब–या, आत्मचरित्र, दिवाळी अंक याही ग्रंथाचा साठा ठेवून वाचकांना सेवा पुरवावी लागते.

ग्रंथ मानसाचे सगळयात जवळचे मित्र आहे. कारण ग्रंथवाचनाने आनंद मिळतो तसेच दुःखाच्या वेळेस दुःख विसरण्यास मदतही मिळू शकते. ग्रंथाच्या सोबतीने मनुष्याच्या आयुष्याला वळण मिळण्यास मदत होते. मोठमोठया संशोधनाच्या अंती निष्कर्ष निघाले आहे की, पुस्तक वाचनाने मेंदू तल्लख होतो व बुध्दीला चालना मिळण्यास मदत होते. ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा साठा त्या साठयातून पाहिजे ते ज्ञान वाचक आत्मसात करू शकतात.

ग्रंथालयात वेगवेळया विषयावर हजारोंनी पुस्तके असतात. व प्रत्येक वेळेस नवीन पुस्तकांची भर ग्रंथालयात पडतच असते. ग्रंथालयात केवळ ग्रंथाच्या स्वरूपातच ग्रंथ असतात असे नाही तर वेगवेगळया विषयावर जर्नल्स्, मासिक तसेच दैंनंदिन जीवनाच्या घडामोडीची माहिता होण्याकरिता दैंनिक वृत्तपत्रे सुध्दा येतात. ज्यांच्याकडे वृत्तपत्रे येत नाही किंवा जे विकत घेऊ शकत नाही ते जवळच्या सार्वजनिक ग्रंथालयात जाऊन वर्तमानपत्र वाचून दैंनदिन घडामोडीची माहिती मिळवू शकतात. त्याचप्रमाणे ग्रंथालयात निरनिराळया देशाचे नकाशे, ज्ञानकोश, इअरबुक, जनरल नॉलेज, चरित्र–आत्मचरित्र, तसेच विनोदी पुस्तके वाचून आपला वेळ घालऊ शकतात. ग्रंथालयातून वाचक ज्ञान आत्मसात करून शिक्षणाचा प्रसार करण्यास मदत मिळू शकते. ग्रंथालयाचा विचार केल्यास ग्रंथालयात ग्रंथाचा साठा मोठया उपलब्ध प्रमाणात उपलब्ध असतो. सगळयाच प्रकारच्या ग्रंथालयात वाचनीय साहित्य उपलब्ध होत असून त्याचा उपयोग करून व्यक्ति आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूादवू शकतात.

ग्रंथालयात पुस्तकांसोबतच जर्नल्स्, मासिके, निसतकालिके, दैनिक वृत्तपत्रे येतात.

याकरिता वेगळया रॅक असतात. त्या रॅकमध्ये प्रत्येक मासिकाचे लेबल लावल्या जाते. त्याच रॅकमध्ये तिथेच ते मासिक ठेवल्या जाते. म्हणजे वाचकांना ते शोधतांना त्रास जाणार नाही. त्याचप्रमाणे ग्रंथालयात येणा—या नवीन ग्रंथासाठी एक कपाट किंवा रॅक राहते तिथे नवीन येणा—या ग्रंथाची प्रत वाचकांना पहायला ठेवण्यात येते. जेणेकरूण वाचकांना नवीन येणा—या ग्रंथाची ओळख होऊ शकेल.

आधुनिक ग्रंथालयाला माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळालेली आहे. ग्रंथालयात दरवेळेस नवीन ग्रंथ तर येतातच पण काही वेळेस एखादया दुर्बल विषयावर माहिती वाचकांना पाहिजे असेल तर अशावेळेस इंटरनेटचा वापर करून माहिती दिल्या जाते. माहिती तंत्रज्ञानाद्वारे संपूर्ण जगाची माहिती एका क्षणात आपल्या जवळ येते. इंटरनेटद्वारे वाचकांना अधिक सक्षमपणे सेवा पुरविणे शक्य होते .माहिती तंत्रज्ञान ग्रंथालयाचा अविभाज्य भाग बनला आहे.

ग्रंथालयात नोटीस बोर्ड लावले जाते. त्या नोटीस बोर्डवर ग्रंथालयाच्या काही सुचना, एखादया दिवसाचे महत्व, सूविचार, वर्तमानपत्राचे कात्रण, लावण्यात येते. ग्रंथालयात येणा—या नवीन ग्रंथाची माहिती नोटीस बोर्डवर लिहिल्या जाते यामुळे नवीन ग्रंथाबदद्ल वाचकांच्या मनात कुतुहल निर्माण होते व ते ग्रंथालयात त्या ग्रंथाबाबत माहिती विचारायला येतात. यामुळे ग्रंथालयाचा प्रसार होण्यास मदत मिळते.

ग्रंथालय आणि माहिती तंत्रज्ञान यांचा जवळचा संबंध आहे. ग्रंथालय शास्त्रावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव ब—याच प्रमाणात असल्याचे दिसून येते. ग्रंथालयातील दैंनदिन कामकाज संगणकाद्वारे केल्या जात आहे. ग्रंथाची नोंद करणे, मासिक आणि जर्नल्स्ची नोंद करणे, रोजची ग्रंथाची देवघेव,इ. कामे संगणकाद्वारे केल्या जात आहे. संगणकाद्वारे सेवा दिल्या जात असल्याने सेवेत जलदगती येते.त्याचप्रमाणे इंटरनेटचा वापर करूनही वाचकांना सेवा देता येतात. इंटरनेटमुळे अनेक प्रकारच्या दुर्बल माहिती वाचकांना मिळू शकते. वाचकांना हवी असलेली माहिती मिळाल्याने वाचक समाधानी होतात. वाचकांचे समाधान होणे हे ग्रंथातयाचे यश असते. म्हणूनच ग्रंथालयात येणा—या प्रत्येक वाचकांचे समाधान करणे ग्रंथालयाचे कर्तव्य असते.

अशाप्रकारे ग्रंथालयाद्वारे जास्तीत जास्त वाचकांना, विद्यार्थांना वाचनाचे समाधान करून सृस्कृत समाज घडविण्यात मदत होते. जितके जास्त लोक वाचनाकडे वळतील तितके त्याचे विचार प्रगल्भ होण्यास मदत मिळते. मनुष्य मनाने, विचाराने, वागण्याने, पगल्भ होणे म्हणजे सुशिक्षित होणे होय. त्याच्यात आशावादी विचार निर्माण होतात. मनुष्याचे आशावादी विचार नेहमी त्यांना चांगल्या कामाकरिता प्रोत्साहित करतात. शिक्षणाने मनुष्याचे आयुष्य घडण्यास मदत मिळते. म्हणूनच मनुष्य, समाज आणि देशाला शिक्षित करण्याचे काम ग्रंथालयाद्वारे करण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्या जातो. आणि याच कारणाने समाजात ग्रंथालयाचे महत्व वाढत असून त्यांना ज्ञान केंद्र असे म्हटले जाते.

ग्रंथालय ही विस्तृत संकल्पना आहे. त्यात ज्ञानाचा साठा भरलेला असतो. त्या

ज्ञानाच्या साठयामधून वाचकांना नेमकी माहिती मिळविणे कठीण जाते. याकरिता ग्रंथालयातील सेवा उपयोगी ठरतात. ग्रंथालयातून दिल्या जाणा–या सेवा मधून संदर्भ सेवा फार महत्वाची मानली जाते कारण ग्रंथालयात येणारे वाचक अनेक प्रकारचे असतात. त्यांच्या मागण्या वेगवेगळया असतात त्या पूर्ण करणे ग्रंथालयाचे कर्तव्य आहे. पण काही वाचक असे असतात की त्यांच्या मागण्या या वेगळया प्रकारच्या असतात त्या पूर्ण करतांना त्यांना विषेष प्रकारच्या सेवा दयाव्या लागतात ती सेवा म्हणजे संदर्भ सेवा होय.आधुनिक ग्रंथालयात संदर्भ सेवा महत्वाची मानल्या गेली आहे.

**निष्कर्ष :**

समाजात काही व्यक्ती अशा असतात की परिस्थिती अभावी , काही कारणामुळे त्यांना शिक्षण पूर्ण करता येत नाही, ते बंद करावे लागते व त्यांची शिक्षणाची इच्छा पूर्ण होत नाही. अशावेळेस त्या व्यक्तीकरिता ग्रंथालय हे एक वरदान ठरते. ग्रंथालयाचा आधार घेऊन राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यास मदत मिळू शकते. तसेच ग्रामीण भागातील शाळा, कॉलेज मध्ये जाणारे गरीब विद्यार्थी मोठया किमतीचे पुस्तके खरेदी करू शकत नाही अशावेळेस ग्रंथालय त्यांना लाभदाय ठरू शकते. ग्रंथालयाद्वारे पुस्तकांचा वापर करून शिक्षण पूर्ण करण्यास मदत होऊ शकते. ग्रंथालय एक ज्ञानकेंद्र असून ग्रंथालयात ज्ञानाचा साठा भरपूर प्रमाणात असतो. फक्त त्याचा वापर करणारे तयार पाहिजे. वाकाकरिता ग्रंथालय वरदानच ठरू शकते. म्हणूनच ग्रंथालय हे ज्ञानाचे एक केंद्र आहे असे म्हणने सार्थ ठरेल.

**संदर्भ :**


- सातारकर, डॉ. एस.पी. :– ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र,अभय प्रकाशन, नांदेड 2006
- डॉ. अजय कुमार सिंह :– पुस्तकालय एवं समाज, अर्जुन पब्लिशिंग हाउस, दरियागंज नई दिल्ली
- प्रा. लक्ष्मण थोरात :– ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
- डॉ. करमरकर, प्रकाश :– ग्रंथालयीन संदर्भसेवा, युनिवर्सल प्रकाशन, पुणे